**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

| VOL- X | ISSUE- VI | JUNE | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# इतिहास विषयाच्या अभिरुची विकसना करिता राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांचा अभ्यास

**डॉ. सुधीर वरबडे (भूमकर)**
**अभिनव आध्यापक महाविद्यालय,**
**लातूर.**

**प्रस्तावना**

इतिहास विषयाचा विचार करता भूतकाळात घडलेल्या घटनांची मालिका इतिहासात असते. इतिहास हा विषय प्राथमिक स्तरापासून लागू करण्यात आलेला आहे. इतिहासामध्ये होऊन गेलेल्या घटकांचा अभ्यास, विविध संस्कृतीचा अभ्यास, समाजकार्य केलेल्या व्यक्तींचा अभ्यास असतो. इतिहास विषय शिकण्याचा हेतू सुजान आणि जबाबदार नागरिक घडविणे हा आहे. त्याचप्रमाणे आधुनिक जगाचा सांस्कृतिक वारसा समजून घेता यावा हा आहे. विद्यार्थ्यांना भविष्यकाळातील आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. तसेच मानवाने केलेली प्रगती व विकास आणि त्यासाठी त्यांने केलेले प्रयत्न अत्यंत स्थूल स्वरूपात समजावून घेता यावेत यासाठी देखील इतिहास विषय शिकणे आवश्यक आहे.

विशिष्ट उद्दिष्टांच्या पुर्तीसाठी तसेच विद्यार्थ्यांचा विकास या ध्येयापर्यंत पोहोचण्या साठी शालेय कार्याचे उत्कृष्ट नियोजन करणे आवश्यक आहे. शैक्षणिक सुधारणांचा विचार केला तर त्यांचा संबंध मुख्याध्यापक शिक्षकांशी येतो. शिक्षण प्रक्रिया कितपत यशस्वी अथवा अयशस्वी झाली ही बाब वर्गात ठरवली जाते. प्रत्येक वर्गात, शाळेत कमी जास्त बुद्धिमत्तेचे विद्यार्थी असतात. त्यांच्या गरजानुसार विशेष व उपचारात्मक अध्यापनाचे कार्य शाळेने हाती घेतलेले असते. त्याचबरोबर जीवन जास्तीत जास्त कार्यक्षमतेने व यशस्वीपणे जगता यावे त्यासाठी विद्यार्थ्यांची अंगभूत कौशल्य विकसित करण्याच्या सातत्यपूर्ण व सुसंगत प्रयत्न म्हणजे जीवनकौशल्याचे शिक्षण हे साध्य होण्यासाठी जीवनाच्या प्राथमिक टप्प्यात विद्यार्थ्यांना संधी देणे गरजेचे आहे. या बरोबरच शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या भौतिक व मानसिक क्षमतांचा जास्तीत जास्त उपयोगातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडविणे आवश्यक आहे. व्यक्तिमत्व घडविण्यासाठी जागतिक आरोग्य संस्थेने पुढील जीवन कौशल्य पुरस्कृत केलेली आहेत.

1. स्वजागृती
2. समस्या निराकरण
3. समानुभूती
4. निर्णय घेणे
5. प्रभावी संप्रेषण
6. चिकित्सक विचार प्रक्रिया
7. सर्जनशील विचार प्रक्रिया
8. भावनांचे समारोह समायोजन
9. आंतरव्यक्ती संबंध
10. ताण-तणावाचे समायोजन

वरील जीवन कौशल्य वर्गाध्यापणातून साध्य करणे अपेक्षित आहे. इतिहास व नागरिकशास्त्र अध्यापनाची उद्दिष्टे व ती जीवन कौशल्य यांची योग्य प्रकारे सांगड घातल्यास वरील पैकी बऱ्याच जीवण कौशल्यांचा परिपोष विद्यार्थ्यांमध्ये करणे शक्य आहे.

**शीर्षक** –

उच्च प्राथमिक वर्गाच्या इतिहास विषयाच्या अभिरुची विकसना करिता राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांचा अभ्यास

**गरज व महत्त्व**

अनेक संशोधने मानवी जीवन सुखी, समृद्धी व आनंदायी करण्यासाठी विविध संशोधने केली जातात. अशा शिक्षण क्षेत्रात केल्या जाणाऱ्या संशोधनाला कृती संशोधन म्हटले जाते कृती संशोधनामुळे शिक्षण क्षेत्रातील अनेक

समस्या जाणून घेणे त्यावर उपाययोजना करता येतात व समस्या सोडविल्या जातात. संशोधनाची गरज पुढील प्रमाणे सांगता येईल.

1. इतिहासातील स्वतंत्र लढा समजण्यासाठी
2. इतिहास विषयाचे ज्ञान घेऊन भूतकाळातील घटनांचा सखोल अभ्यास करण्यासाठी.
3. इतिहास विषय समजून घेताना येणाऱ्या अडचणींचा शोध घेण्यासाठी.
4. इतिहास विषयाची अभिरुची वाढविण्यासाठी.

**संशोधनाचे महत्त्व पुढील प्रमाणे.**

1. इतिहास विषय शिक्षक निर्मिती विविध उपक्रमाद्वारे दृढ होण्यास मदत होते.
2. विद्यार्थ्यांवर पर्यायी उपाय योजनांचा वापर करता येतो.
3. इतिहासातील महत्त्वाच्या घटना सांगतांना होणाऱ्या चुका लक्षात येतात व त्यावर उपाययोजना करता येते.
4. विद्यार्थ्यांना अध्ययन करतांना विविध प्रकारच्या समस्या भेडसावत असतात त्या समस्या दूर करण्यासाठी शिक्षक त्या पातळीवर प्रयत्न करत असतात.

**संशोधनाची उद्दिष्टे**

संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे

1. इतिहास विषयाची आवड नसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कारणांचा शोध घेणे.
2. इतिहास विषयात रूची आवड निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.
3. शिक्षक निर्मित उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या अभिरुची वर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके**

1. प्राथमिक स्तरावर प्रस्तुत संशोधन इतिहास अध्यापनाच्या विषय आहे.
2. इतिहास विषयामुळे ऐतिहासिक प्रसंग घटना समजण्यास मदत होते.
3. शिक्षक निर्मिती उपक्रमामुळे इतिहास विषयात भरूची वाढते.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

1. सदरील संशोधन उच्च प्राथमिक शाळेशी संबंधित आहे.
2. हे संशोधन पाचवी ते सातवी या विद्यार्थ्यांना उपयुक्त आहे.
3. हे संशोधन इतिहास विषयाशी निगडित आहे.
4. इतिहास विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांची संबंधित आहे.

**मर्यादा**

1. हे संशोधन केवळ उच्च प्राथमिक शाळेशीच संबंधित आहे.
2. हे संशोधन पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी पुरतेच मर्यादित आहे.
3. हे संशोधन केवळ इतिहास विषयापुरतेच मर्यादित आहे.
4. हे संशोधन इतिहास विषय शिकवणाऱ्या शिक्षकांशी संबंधित आहे.

**शिक्षक निर्मिती उपक्रम**

1. चित्ररूप माहिती दाखविणे.
2. नाट्यीकरणातून इतिहास अध्यापन करणे.
3. प्रश्नमंजुषा
4. संवाद
5. वेशभूषे संबंधी चित्रे
6. चित्रफीत दाखविणे
7. किल्ल्यांच्या प्रकृती
8. सहलीचे आयोजन करणे
9. लढाईत वापरल्या जाणाऱ्या साहित्यांची चित्र
10. महात्मे व संतांच्या वचनाचे तक्ते.

**संशोधनाची पद्धती**

संशोधनाच्या तीन पद्धती आहेत.

1. ऐतिहासिक संशोधन पद्धती.
2. सर्वेक्षण संशोधन पद्धती.
3. प्रायोगिक संशोधन पद्धती.

सदरील संशोधनासाठी वरील पैकी प्रायोगिक संशोधन पद्धतीची निवड केलेली आहे. कारण असे की

विद्यार्थ्यांच्या इतिहास विषय, त्या विषयाच्या समस्या विद्यार्थ्यांना हा विषय न आवडण्याची कारणे. इतिहासाचा अभ्यास करून उपक्रम राबविण्यासाठी प्रायोगिक पद्धतीचा उपयोग होतो. त्याचबरोबर प्रायोगिक पद्धती ही शास्त्रीय पद्धत आहे. यामध्ये अचूकता असते तसेच याची तपासणी संख्याशास्त्रीय पद्धतीने करता येते.

**संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही**

प्रारंभी समस्या निश्चित केली. विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी घेतली किंवा अभिरूची तपासली. उपाय योजना केली. उत्तर चाचणी घेतली. यानंतर माहितीचे विश्लेषण केले. अहवाल लेखन

**निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष पुढील प्रमाणे

1. इतिहास विषयात विद्यार्थ्यां मध्ये गोडी निर्माण झाली.
2. इतिहास विषयातील संबोध समजून घेऊ लागले.
3. इतिहासातील घटना समजून घेऊ लागले.
4. विविध पात्रांचे नाते संबंध समजू लागले.
5. सनावळ्या विद्यार्थी समजून घेऊ लागले.
6. पोवाडे, वर्णन यामधून विद्यार्थ्यांच्या इतिहासाचा अभिरुचीत वाढ झाली.
7. इतिहासाच्या पुस्तकातील चित्रांचे निरीक्षण करून वर्णन करू लागले.
8. विद्यार्थी विविध किल्ल्यांची माहिती चित्ररूपाने जमा करू लागले.
9. इतिहास विषयाचे वाचन विद्यार्थी आवडीने करू लागले.

**संदर्भ ग्रंथ**

1. डॉ. करंदीकर सुरेश व डॉ. व. झा. साळे (ऑ. 2005 ) कृति संशोधन व नवोपक्रम फडके प्रकाशन कोल्हापूर
2. डॉ. पारसनीस हेमलता व डॉ. देशपांडे लीना (2006) शैक्षणिक कृति संशोधन नित्य प्रकाशन पुणे
3. भराडे प्रतिभा ऑगस्ट 2005 शैक्षणिक प्रकल्प नवोपक्रम सौरभ प्रकाशन पुणे
4. भिडे अ. म. अक्षर कसे सुधारावे जोत्सना प्रकाशन पुणे